**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं.४०/२०२४.**
**निशाणी क्रं.१.**

## सत्यापन (Verification)

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**साक्षीदार क्र.२ : माझे नाव : रामदास कृष्णा बडधे,**
वय ५० वर्षे, धंदा : शेती,
राहणार : कोडीत, ता. पुरंदर, जि. पुणे.

घटना ही दि.०८/०१/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते ११.१५ वाजणेचे सुमारास गट नं.४३८ मौजे कोळविहिरे, ता.पुरंदर येथे फिर्यादीच्या शेतामध्ये घडली. सदरील दिवशी, ठिकाणी व वेळी मी व फिर्यादी शेतीच्या कामासाठी गेलो असता त्याठिकाणी गैरअर्जदार क्रं.१ व २ नामे अनुक्रमे शेखर जालिंदर खैरे व जालिंदर मारूती खैरे हे तेथे आले व आम्हास म्हणाले की, आमच्या गटाची मोजणी चालू आहे तर तुम्ही नोटीसीवर सह्या करा. त्यावर फिर्यादी त्यांना म्हणाले की, त्यांना सरकारी नोटीस आली नसल्यामुळे ते नोटीसीवर सही करू शकणार नाही असे म्हणले असता त्यांनी फिर्यादीस आई-वडीलांवरून शिविगाळ करण्यास चालू केले व त्यांच्या अंगावर धावून येवून तुम्ही येथे शेती कशी करता तेच बघतो असे म्हणून दमदाटी केली. त्यानंतर ते तेथून निघून गेले.

**सत्यापन पुर्ण.**

.......................................
(सत्यापन करणाराची सही)

''समक्ष''

दिनांक :१४/०५/२०२४.

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, सासवड.